महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.
M. S. Board of Secondary & Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board
Vashi, Navi Mumbai - 400 703.

महत्वाचे
तातडीचे

क्र. मुंविम/संशोधन/५३३१
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३
दिनांक ११.०५.२०१२

प्रति,

मा. विभागीय शिक्षण उपसंचालक,
ब्रहन्मुंबई विभाग,
चर्नी रोड,
मुंबई ४०० ००४.

**विषय :** उच्च माध्यमिक शिक्षकांच्या निवड श्रेणी सेवांतर्गत प्रशिक्षणाबाबत.
**संदर्भ :** राज्य मंडळाचे क्र.रा.मं. / पापुई / निश्रेप्र / उमा निश्रेप्र / २५९६, दिनांक १३.०४.२०१२ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, ज्या उच्च माध्यमिक शिक्षकांची सेवा २४ वर्षे पूर्ण झालेली आहे व ज्यांनी एम.एड. अथवा एम.फील. अथवा पी.एच.डी. अथवा एम.एस.ए.सी.आय.टी. ( MSACIT ) हा संगणक अभ्यासक्रम ही शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेली आहे अशा पात्र शिक्षकांसाठी निवडश्रेणी प्रशिक्षण दिनांक ०१.०६.२०१२ ते ०५.०६.२०१२ या कालावधीत सकाळी १० ते ५ या वेळेत आयोजित करावयाचे आहे.

१. ज्या विभागाकडून त्यांच्या अंतर्गत जिल्हयांची शिक्षक संख्या राज्य मंडळास प्राप्त झालेली आहे त्यांचाच प्रशिक्षणसाठी विचार करण्यात आलेला आहे.
२. प्रशिक्षण केंद्राची नांव व त्या केंद्रावर उपस्थित राहणाऱ्या विभागवार व जिल्हावार शिक्षकांची संख्या याबाबतची माहिती संदर्भिय पत्रान्वये आपणांस कळविण्यात आलेली आहे. त्यानुसार संबंधित शिक्षकांना उपस्थित राहणेबाबतच्या सूचना आपल्या स्तरावर शिक्षणाधिकारी (माध्य) व शिक्षण निरीक्षक यांना त्वरीत देण्यात याव्यात.
३. ज्या जिल्हयातील शिक्षक ज्या केंद्रावर दर्शविलेले आहेत त्याच ठिकाणी त्यांना उपस्थित राहणेबाबत कळविण्यात यावे.
४. प्रशिक्षणापासून कोणीही वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
५. प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी सर्व उपस्थिती आवश्यक आहे. दुसऱ्या दिवशी कोणालाही हजर करून घेण्यात येऊ नये.
६. प्रशिक्षणाच्या कालावधीमध्ये जे शिक्षक उपस्थित राहून गृहकार्य पूर्ण करतील त्यानांच प्रमाणपत्र देण्यात येईल. याबाबत संबंधितांना आपल्या स्तरावर सूचना देण्यात यावी.
७. ज्या केंद्रावर प्रशिक्षणासाठी शिक्षक उपस्थित राहणार आहेत त्यांची यादी संबंधित केंद्रावर तातडीने पाठविण्याची व्यवस्था करण्यात यावी.
८. एका प्रशिक्षण वर्गात ५० ते ६० शिक्षकांची संख्या असावी.
९. ज्या केंद्रावर ५० ते ६० पेक्षा जास्त शिक्षक उपस्थित राहिल्यास त्या केंद्रावर केंद्र संचालकाने दुसऱ्या प्रशिक्षण वर्गास पुरेशी संख्या झाल्यास त्या ठिकाणी वेगळा वर्ग करावा व उपस्थित तज्ञांकडून त्यांना मार्गदर्शन देण्याची व्यवस्था करावी. याबाबतच्या सूचना केंद्र संचालकांना आपल्या स्तरावर देण्यात यावी.
१०. निवडश्रेणी प्रशिक्षणासाठी उपरोक्त अर्हता ज्यांनी धारण केलेली आहे त्यांना प्रशिक्षणासाठी पाठविण्यात यावे.

संकीर्ण
(MB)
22-5-2012

Telephone : 2765 2445, 2766 2504, 2788 1077, 2788 1075, 2789 9987 • Fax : 2765 9491
Email : sscboard@vsnl.com
(कृ.मा.प.)

११. अर्हता प्राप्त नसलेल्या शिक्षकास प्रशिक्षणासाठी रूजू करून घेतले जाणार नाही, याची दक्षता घ्यावी. एम.एस.ए.सी.आय.टी. हा संगणक अभ्यासक्रम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र पाहून, खात्री करूनच प्रशिक्षणासाठी रूजू करून घेण्यात यावे.

१२. तसेच ज्यांनी प्रशिक्षणासाठी शैक्षणिक अर्हता धारण केलेली आहे व ज्यांची सेवा २४ वर्षे पूर्ण झालेली आहे, त्यांना प्रशिक्षणासाठी पाठविण्यास हरकत नाही.

१३. संबंधित सर्व शिक्षकांनी सदरहू प्रशिक्षण स्वखर्चाने करावयाचे आहे. याबाबत आपण आपल्या स्तरावर स्पष्ट सूचना त्यांना देण्यात यावी.

१४. प्रशिक्षण कालावधीत प्रत्येक केंद्रावर आपल्या कार्यालयचा किंवा शिक्षणाधिकारी (माध्य) कार्यालयाच्या एका प्रतिनिधीस प्रशासकीय संपर्क प्रमुख म्हणून नियुक्ती करावी व त्यास उपस्थित राहणेबाबत कळविण्यात यावे व त्याचे नांव, भ्रमणध्वनी क्रमांक (मोबाईल) राज्य मंडळ कार्यालयास व विभागीय मंडळ कार्यालयास कळविण्यात यावे.

तरी उपरोक्त प्रमाणे सर्व सूचना केद्र संचालकास देण्यात येऊन निवड श्रेणी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण होईल असे पहावे.

आपला विश्वासू,

(आर.आर.भिसे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवीमुंबई-४०० ७०३.

प्रत माहितीस्तव :

४. मा. सचिव, राज्यमंडळ, पुणे-४.
५. शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद कार्यालय, ठाणे / रायगड.
६. शिक्षण निरीक्षक (दक्षिण/उत्तर/पश्चिम विभाग) बृहन्मुंबई.

ज्ञीशरीलहद